महाराष्ट्र पोलीस

जा.क्र.पोआअ/आस्था-प्रलि/पदो.पोना ते पोहवा/ 10675 /२०२१
पोलीस आयुक्त,अमरावती शहर यांचे कार्यालय, कॅम्प रोड,
अमरावती दुरध्वनी क्र.०७२१-२५५१००१ फॅक्स क्र.-२५५१०२०
ई मेल आयडी-cp.amravati@mahapolice.gov.in
दिनांक - [illegible] 2021

## आदेश

पोलीस आयुक्त, अमरावती शहर आस्थापनेवरील खालील नमुद पोलीस नाईक (अराजपत्रीत गट-क) यांना महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्रमांक :- बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ०७.०५.२०२१ अन्वये मा.सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्रमांक २८३०६/२०१७ वरील अंतिम निर्णयाच्या अधिन राहून दिनांक २५.०५.२००४ रोजीच्या स्थितीनुसार सेवाज्येष्ठतेने खालील अटींचे अधिन राहून पोलीस हवालदार (अराजपत्रीत गट-क) या पदावर वेतन संरचना वेतन स्तर एस-९, रु.२६४००-८३६००/- अधिक विशेष वेतन रु.७५०/- मध्ये तात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहे.

| पदनाम | वेतनस्तर | विशेष वेतन |
|---|---|---|
| पोलीस हवालदार | एस-९, रु.२६४००-८३६००/- | विशेष वेतन रु. ७५०/- |
| पोलीस नाईक | एस-८, रु.२५५००-८११००/- | विशेष वेतन रु. ७५०/- |

| अ.क्र. | पदनाम/ब.नं. | पोलीस अंमलदाराचे नांव | जात/प्रवर्ग | पदोन्नती दिलेला प्रवर्ग |
|---|---|---|---|---|
| 1. | पोना/1042 | गणेश रमेशराव नारनवरे | बौद्ध/ अ.जा. | ज्येष्ठतेनुसार |
| 2. | पोना/131 | विलास भिमराव जामनेकर | कोळी/ विमाप्र | ज्येष्ठतेनुसार |
| 3. | पोना/1173 | संजय नारायणराव कोठेकर | कोष्टी/ विमाप्र | ज्येष्ठतेनुसार |
| 4. | पोना/1227 | सुनिल श्रीराम कुसराम | गोंडगवारी/ विमाप्र | ज्येष्ठतेनुसार |
| 5. | पोना/1229 | किशोर प्रभाकरराव महाजन | गोंधळी/ भजब | ज्येष्ठतेनुसार |
| 6. | पोना/721 | उज्वला अशोक झाडे | किरात/ भजब | ज्येष्ठतेनुसार |
| 7. | पोना/234 | संजय विठ्ठलराव गावंडे | धनगर/ भज क | ज्येष्ठतेनुसार |

१. उपरोक्त पोलीस अंमलदाराविरुध्द विभागीय चौकशी/ प्राथमिक चौकशी सुरु असेल किंवा न्यायालयात खटला चालू असेल किंवा न्यायालयाने दिलेल्या इतर निर्णयाविरुध्द वरीष्ठ न्यायालयात अपिल प्रलंबित असेल किंवा ते एखादी शिक्षा भोगत असतील तर त्यांना पदोन्नती न देता सविस्तर अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करावा. तसेच वरील प्रमाणे पदोन्नती दिल्यानंतर मागाहून कोणतीही प्रतिकुल बाब निदर्शनास आल्यास संबधित अंमलदारास देण्यात आलेल्या पदोन्नतीचे पदावरुन तात्काळ पदावनत करण्यात येईल.

२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही/२०१८/प्र.क्र.१५९/कार्यासन-१२, दि.०१.०८.२०१९ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार सन २०१९-२०२० च्या वित्तीय वर्षाचे माहे मार्च २०२० अखेरपर्यंतचे मत्ता व दायीत्व विवरणपत्र सादर केले नसल्यास त्यांनी तात्काळ सदर विवरणपत्र सादर करावे. आणि ती त्यांची स्वत: ची जबाबदारी राहील. त्यांना देण्यात आलेली पदोन्नती या कारणास्तव कोणत्याही वेळी काढून घेण्यात येईल याची संबधीतांनी नोंद घ्यावी.

३. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.पीएधवाय/१०८२/सीआर/११०० (२)/एसईआर-३, दि.०६.११.१९८४ अन्वये पदोन्नती नंतर कनिष्ठ पदावर वेतनवाढ दिल्यानंतर वेतन निश्चिती करण्याबाबतचा विकल्प

द्यावयाचा असेल तर तो पदोन्नती दिल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत देण्यात यावा. अशा प्रकारचा विकल्प विहीत एक महिन्याच्या आत न दिल्यास पदोन्नत पदावरील वेतन निश्चिती म.ना.सेवा (वेतन) नियम, १९८१ मधील नियम ११(१)(ए) प्रमाणे पदोन्नतीचा दिनांक विचारात घेवून करण्यात येईल. याबाबत नोंद घ्यावी.

४. पदोन्नत झालेल्या सर्व पोलीस हवालदार यांचे अभिनंदन व शुभेच्छा.

(डॉ.आरती सिंह)
पोलीस आयुक्त, अमरावती शहर

प्रति,

पोलीस निरीक्षक, पो.स्टे.राजापेठ/कोतवाली/फ्रेजरपूरा/शवाशा, अमरावती शहर
राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, अमरावती शहर

प्रत,

प्रशासकीय अधिकारी/कार्यालय अधिक्षक/ स्विव्य सहाय्यक/ प्रमुख लिपीक (पत्रव्यवहार शाखा/लेखा शाखा /विभागीय चौकशी शाखा), पो.आ. कार्यालय, अमरावती शहर

प्रत,

आस्थापना लिपीक/ वेतन निश्चिती लिपीक/ वेतन लिपीक (लेखा शाखा)/ पोलीस पत्रिका लिपीक/ सेवापट नोंदणी लिपीक /सीसीटीएनएस यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

प्रत माहितीस्तव,

पोलीस उपायुक्त परिमंडळ १ व २, अमरावती शहर
पोलीस उपायुक्त (मुख्यालय), अमरावती शहर